नियमित फौजदारी खटला क्र. १६१/२०२३
निशाणी क्र.८०/क

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ९ ची जबानी**

माझे नांव - उदयसिंह दिपक भोवळे
वय वर्षे - ३५
नोकरी - बेकरी
राहणार - वाठार, ता.हातकणंगले जि.कोल्हापूर

**सरतपास सरकारी वकील सौ.आर.एच.मोरे यांच्यातर्फे**

दि.०४/०३/२०२३ रोजी पोलीसांनी वडगांव पोलीस स्टेशन येथे पंचनामासाठी बोलावले होते. माझ्यासोबत दुसरे पंच धनवडे म्हणून होते. पोलीस स्टेशनला गेलेनंतर पोलीसांना आम्हाला सांगीतले की, कमाल पटवेगार व्यक्तीने सी.सी.टी.व्ही.फुटेज पेन ड्राईव्हमध्ये आणलेला आहे, त्याचा पंचनामा करायचा आहे. त्या पंचनामाकरीता पंच म्हणून आम्ही तयार झालो.

कमला पटवेगारनी सी.सी.टी.व्ही.फुटेज असलेला पेन ड्राईव्ह आमच्या समक्ष पोलीसांना दिला व पोलीसांनी तो जप्त केला. पोलीसांनी तो पेन ड्राईव्ह कॉम्प्यूटरला लावून त्याचा हॅश व्हॅल्यू काढून घेतला होता. त्यानंतर पोलीसांनी तो जप्त करुन त्याचा पंचनामा केला. पेन ड्राईव्ह हा स्टील बॉडीमध्ये KDM कंपनीचा 32 GB चा होता. आता मला दि.०४/०३/२०२३ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि.८१ देण्यात येत आहे. मला जर तो पेन ड्राईव्ह दाखविला तर तो ओळखू शकतो. आता मला तो पेन ड्राईव्ह दाखविण्यात आला. तो तोच पेन ड्राईव्ह आहे. त्याला MO 4 देण्यात येत आहे. पंचनामा हा ३ जे ५ वाजेपर्यंत चालू होता.

उलटतपास संपला.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.डी.पी.पाटील यांच्यातर्फे -**

मी इयत्ता १० पर्यंत शिकलेलो आहे. मला इग्रजीमध्ये लिहता वाचता येत नाही. तसेच मी कॉम्प्यूटरचा कोर्सही केलेला नाही. मला कॉम्प्यूटरचे सॉफ्टवेअर व हार्डवेअर बाबतचा अनुभव नाही. मला आज पेन ड्राईव्हमधील व्हीडोओ दाखविलेला नाही.

पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर पेन ड्राईव्हमधील मजकूराची पाहणी केलेली होती. पेन ड्राईव्हमध्ये किती फाईल्स व किती MB Size च्या होत्या हे मला सांगता येणार नाही. पेन ड्राईव्ह मी स्वत लावून पाहील्या नसल्यामुळे त्यामध्ये किती ऑडीओ, व्हीडीओ व अन्य इतर फाईल्स आहेत हे मला सांगता येणार नाही.

हे म्हणणे खरे आहे की, हॅश व्हॅल्यू काढतात याबाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना मदत करण्याकरीता तयार पंचनामावर मी सही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, हॅश व्हॅल्यू काढायला वापरलेले सॉफ्टवेअर व Algorithm मला सागता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, हॅश व्हॅल्यू काढण्याची प्रक्रिया माझ्या समोर न झाल्यामुळे मला वापरलेले सॉफ्टवेअर व Algorithm सांगता येणार नाही. पोलीसांनी पेन ड्राईव्ह जप्त केल्यावर लाखेचे सील ने सील केले होते. आता मला पेन ड्राईव्ह ठेवलेला लखोटा दाखविण्यात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर लाखेचे सील नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामातील मजकूराबाबत मला वैयक्तीक माहीती नाही.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामधील सपूर्ण मजकूर हा खोटा व चूकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, कमाल पटवेगार माझ्या शेजारी राहतात. हे म्हणणे खरे नाही की, कमाल पटेगारला मदत करण्याकरीता व माणूसूकीच्या भावणेने आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/-

(आर.एस.मोरे)

दि. ०५/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगाव